राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग
औरंगाबाद सर्कीट बेंच कार्यालयासाठी
पदे मंजूरीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : ग्रासंक-१५०५/८१३/प्र.क्र.३०८९/ग्रा.सं.३,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : ११ ऑक्टोबर,२००६.**

पहा :- अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे क्रमांक-एससी/०५/बॅकलॉग/३८, दिनांक २६ मे,२००५ चे पत्र.

प्रस्तावना :- केंद्र शासनाने सन २००२ मध्ये ग्राहक संरक्षण अधिनियमात सुधारणा करुन सुधारित ग्राहक संरक्षण अधिनियम मार्च,२००३ पासून अंमलात आणलेला आहे. ग्राहक संरक्षण अधिनियमातील सुधारित तरतूदीनुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई येथील मुख्यालयाव्यतिरिक्त राज्य शासन निर्धारित करेल त्या ठिकाणी परिक्रमा खंडपीठे (सर्कीट बेंचेस) स्थापन करण्याची तरतूद ग्राहक संरक्षण अधिनियमाच्या कलम-१७ (बी) मध्ये विहित करण्यात आली आहे. ग्राहक संरक्षण अधिनियमातील तरतूदीनुसार राज्य आयोगाचे सर्कीट बेंच नागपूर व्यतिरिक्त औरंगाबाद येथे स्थापन करण्याची आवश्यकता आहे. त्यास अनुसरुन औरंगाबाद सर्कीट बेंच कार्यालयासाठी आवश्यक पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**: शा स न  नि र्ण य :**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या औरंगाबाद येथील सर्कीट बेंचसाठी अधिकारी / कर्मचा-यांची १० पदे, सदस्य-१ पद व न्यायिक सदस्य-१ पद याप्रमाणे पदनिर्मिती करावयाच्या प्रस्तावास राज्य मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे.त्यानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविलेली अधिकारी / कर्मचा-यांची १० पदे व सदस्य-१ पद ,न्यायिक सदस्य-१ पद अशी एकूण १२ पदे निर्माण करण्यास शासन याद्वारे मंजूरी देत आहे.

२. परिशिष्टातील कर्मचा-यांची १० पदे ही नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत असून, सदरहू मंजूर पदे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार विहित मार्गाचा अवलंब करुन भरण्यात यावी.

३. याबाबतचा होणारा खर्च मागणी क्रमांक-एम-२,"२४०८-अन्न साठवण व वखार साठवण-०१-अन्न-१०१-प्रापण व पुरवठा (चार) ग्राहक संरक्षण अधिनियम,१९८६ अंतर्गत राज्य परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंचाची स्थापना (ए) मुफसल (२४०८०२६२) ०१ वेतनावरील खर्च" या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

25Cr.3089E:\Kothe

४. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-३११/०६/व्यय-४, दिनांक २०.५.२००६ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(कि. ब. कदम)
अवर सचिव
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

प्रत,

(१) महालेखापाल-१ व २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई व नागपूर.
(२) महालेखापाल-१ व २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई व नागपूर.
(३) वित्त विभाग (वित्तीय सुधारणा-१/व्यय-४), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
(४) सर्व विभागीय आयुक्त.
(५) सर्व जिल्हाधिकारी.
(६) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
(७) नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
द्वारा,वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
(९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
(१०)निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
(११) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
(१२) जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद.
(१३) अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
(१४) प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
(१५)विधी प्रबंधक,राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे नागपूर सर्कीट बेंच,नागपूर
(१६) प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच.
(१७) कार्यासन अधिकारी, ग्रा.सं.२ व ग्रा.सं.४, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
(१८) निवड नस्ती (ग्रा.सं.३)

26Cr.3089E:\Kothe

# परिशिष्ट-१

(शासन निर्णय क्रमांक-ग्रासंक-१५०५/८१३/प्र.क्र.३०८९/ग्रा.सं.३, दिनांक ११ ऑक्टोबर,२००६ चे सहपत्र)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे औरंगाबाद सर्किट बेंच, औरंगाबाद | प्रबंधक (विधी) | १ | १०६५० - १५८०० |
| | | लेखाधिकारी | १ | ६५०० - १०५०० |
| | | शिरस्तेदार | १ | ५५०० - ९००० |
| | | अधीक्षक | १ | ५५०० - ९००० |
| | | लघुलेखक (उच्चश्रेणी) | १ | ६५०० - १०५०० |
| | | लिपिक- टंकलेखक | २ | ३०५० - ४५९० |
| | | शिपाई | २ | २५५० - ३२०० |
| | | रखवालदार | १ | २५५० - ३२०० |
| | | न्यायिक सदस्य | १ | १६७५० - २०५०० |
| | | सदस्य | १ | रु.५००/- प्रति बैठक (अंशकालिन तत्वावर) किंवा दरमहा रु. १०,०००/- दरमहा मानधन (पूर्णकालिक तत्वावर) |
| | | एकूण पदे | १० + २ | |